# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं

**दिनांकः30.09.2024** **वारःसोमवार**

---

1. पुण्यातील नवे प्रकल्प शहरी विकासाला चालना देत लोकांचं जीवनमान सुकर बनवतील-पंतप्रधानांचा विश्वास,
2. 'मन की बात' च्या दशकपूर्तीनिमित्त पंतप्रधानांनी प्रसारमाध्यमांप्रति व्यक्त केली कृतज्ञता,
3. उद्याच्या तिसऱ्या आणि अंतिम टप्प्यातील मतदानासाठी जम्मू आणि काश्मीरमध्ये कडक सुरक्षा व्यवस्था, आणि
4. हॉकी इंडिया कनिष्ठ महिला राष्ट्रीय अजिंक्यपद स्पर्धेला आजपासून रांची इथं आरंभ.

**मोदी**

'महाराष्ट्र आणि विशेषतः पुण्यातील नव्यानं सुरू होत असलेले प्रकल्प शहरी विकासाला चालना देतील तसंच लोकांच्या जीवनमान सुलभतेमध्ये लक्षणीय भर घालतील,' असं पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी म्हटलं आहे. पंतप्रधानांच्या हस्ते काल दूरदृश्य प्रणालीच्या माध्यमातून महाराष्ट्रात 11 हजार 200 कोटी रुपयांच्या विविध विकास प्रकल्पांची पायाभरणी आणि लोकार्पण करण्यात आलं, त्यावेळी ते बोलत होते.

पुणे मेट्रोच्या शिवाजीनगर न्यायालय ते स्वारगेट या मार्गाचं उद्घाटन, स्वारगेट ते कात्रज या नवीन विस्तारित मार्गिकेचं आणि पुण्यातील भिडेवाडा इथल्या क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले स्मारकाचं भूमिपूजनही काल पंतप्रधानांच्या हस्ते झालं. पुण्याच्या वाढत्या लोकसंख्येमुळे शहराच्या विकासाचा वेग मंदावू नये आणि वाढत्या शहरीकरणाच्या काळात पुणे विकासाचं एक महत्त्वाचं केंद्र व्हावं, यासाठी राज्य सरकार प्रयत्नशील असल्याचं मोदी म्हणाले.

सोलापूर विमानतळाच्या नूतनीकरणाबाबत पंतप्रधान म्हणाले की, या विमानतळामुळे या भागातील दळणवळण लक्षणीयरीत्या वाढेल आणि पंढरपूरमधील पर्यटन, विशेषतः धार्मिक पर्यटनाला चालना मिळेल. बिडकीन औद्योगिक वसाहतीचं उद्घाटनही पंतप्रधानांनी केलं. 'मराठवाड्याला प्रमुख आर्थिक केंद्र बनवण्याची क्षमता बिडकीन औद्योगिक क्षेत्रात आहे. या प्रकल्पामुळे मोठी गुंतवणूक होईल आणि या परिसरात हजारो रोजगाराच्या संधी निर्माण होतील,' असा विश्वास पंतप्रधानांनी यावेळी व्यक्त केला.

कार्यक्रमात राज्यपाल सी. पी राधाकृष्णन दूरस्थ पद्धतीनं तर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार, केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांच्यासह अन्य मान्यवर प्रत्यक्ष उपस्थित होते. पायाभूत सुविधा आणि उद्योग क्षेत्रात महाराष्ट्र देशात अग्रेसर असल्याचं मुख्यमंत्री आपल्या भाषणात म्हणाले. पुण्याचा झपाट्याने विकास होत असताना इथली वाहतूक कोंडी कमी करणं ही राज्यशासनाची जबाबदारी आहे; म्हणूनच पुण्याच्या मेट्रोचा विस्तार करण्यात येत असल्याचं मुख्यमंत्र्यांनी सांगितलं. पुरंदर विमानतळाचा प्रश्न लवकर मार्गी लावावा, अशाही सूचनाही त्यांनी संबंधितांना दिल्या.

**मन की बात**

सर्जनशील कलाकारांच्या प्रतिभेला संधी देण्यासाठी माहिती आणि प्रसारण मंत्रालयानं सुरू केलेल्या क्रिएट इन इंडिया या उपक्रमात सहभागी होण्याचं आवाहन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी काल देशातील युवावर्गाला केलं. आकाशवाणीवरील 'मन की बात' या कार्यक्रमाच्या 114 व्या भागात त्यांनी काल देशवासीयांशी संवाद साधला.

'मन की बात' या कार्यक्रमाची येत्या तीन ऑक्टोबरला दशकपूर्ती होते आहे; त्या पार्श्वभूमीवर, या कार्यक्रमाच्या प्रसारणाची धुरा सांभाळणाऱ्या आकाशवाणी, दूरदर्शन, त्याबरोबरच अन्य प्रसारमाध्यमं आणि समाज माध्यमांप्रति पंतप्रधानांनी कृतज्ञता व्यक्त केली. लोकांना सकारात्मक, प्रेरणादायी गोष्टी ऐकायला आवडतात, हे मन की बात या कार्यक्रमानं सिद्ध केलं असं ते म्हणाले. 2014 मध्ये सुरू केलेल्या स्वच्छ भारत मिशन, तसंच मेक इन इंडिया या उपक्रमांचीही यंदा दशकपूर्ती होत आहे; याबाबत सांगताना, राज्यातल्या भंडाऱ्याच्या टसर सिल्क हँडलूमचा उल्लेख त्यांनी केला. स्थानिक समुदायांना सक्षम करणं, हाच 'मेक इन इंडिया'चा गाभा असून लोकसहभागातून या चळवळीं यशस्वी झाल्याचं ते म्हणाले. येत्या सणासुदीच्या काळात स्थानिक उत्पादनांची खरेदी करा; केवळ मातीचे दिवे खरेदी करणं म्हणजे वोकल फॉर लोकल नसून भेटवस्तू देतानाही स्थानिक उत्पादनांना अधिकाधिक पसंती द्या, असं आग्रही प्रतिपादन पंतप्रधानांनी केलं.

मध्य प्रदेशातील बडवणी इथं शारदा बचतगटाच्या महिलांनी मत्स्यपालनाच्या व्यवसायाची यशस्वी सुरवात केल्याबद्दल मोदी यांनी त्यांची प्रशंसा केली. उत्तरकाशी मधलं झाला गाव युवकांनी हगणदारीमुक्त केल्याचा गौरवपूर्ण उल्लेख त्यांनी केला. 'रिड्यूस, रीयूज आणि रीसायकल' हे अभियान आता सर्वसामान्य लोकांपर्यंत पोहोचलं असून त्याचा सर्वांनी उपयोग करावा, असं आवाहन त्यांनी यावेळी केलं. देशात 20 हजारांहून अधिक भाषा आणि बोली अस्तित्वात आहेत. संथाली भाषा आणि तिची 'ओल तिची' लिपी यांचं डिजिटल प्रयासाद्वारे जतन संवर्धन करण्याचे प्रयत्न सुरू असून 'एक पेड मा के नाम' लावण्याचं आवाहन पंतप्रधानांनी केलं. आगामी नवरात्रोत्सवासहित विविध सण उत्सवाबद्दल त्यांनी देशवासियांना शुभेच्छा दिल्या.

**<u>प्रचार</u>**

जम्मू-काश्मीरमधील विधानसभा निवडणुकीच्या तिसऱ्या आणि शेवटच्या टप्प्यातील प्रचार काल संध्याकाळी संपला. काल अखेरच्या दिवशी विविध राजकीय पक्षांच्या स्टार प्रचारकांनी सभा आणि मतदारांच्या भेटीगाठी घेत जोरदार प्रचार केला. या टप्प्यात उद्या, 1 तारखेला 40 विधानसभा मतदारसंघांसाठी मतदान होणार आहे. आरएस पुरा-जम्मू दक्षिण या जम्मू जिल्ह्यातील महत्त्वाच्या मतदारसंघांपैकी एक असलेल्या मतदारसंघात उद्या मतदान होत असून मतमोजणी येत्या आठ ऑक्टोबरला होणार आहे. उद्याच्या मतदानाची प्रक्रिया सुरळीतपणे पार पडावी, यासाठी संपूर्ण प्रदेशात कडक सुरक्षा व्यवस्था तैनात करण्यात आली आहे.

**<u>जमैका</u>**

जमैकाचे पंतप्रधान डॉक्टर अँड्र्यू होलनेस आजपासून चार दिवसांच्या भारत दौऱ्यावर आहेत. जमैकाच्या पंतप्रधानांचा द्विपक्षीय स्तरावरील हा पहिलाच भारत दौरा आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि जमैकाचे समपदस्थ यांच्या विविध मुद्यांवरील बैठकीच्या निमित्ताने यापुर्वी अनेकदा भेटी झाल्या आहेत. जमैकाचे पंतप्रधान या भेटीदरम्यान पंतप्रधान मोदी यांच्यासह राष्ट्रपती आणि उपराष्ट्रपतींची भेट घेणार आहेत. तसंच विविध क्षेत्रातील व्यापार आणि औद्योगिक प्रतिनिधींबरोबर बैठकीत सहभागी होतील. द्विपक्षीय संबंधांना चालना देण्याच्या उद्देशाने अनेक सामंजस्य करार होण्याची शक्यता आहे. डॉक्टर अँड्र्यू यांच्या भेटीमुळे भारत आणि जमैका दरम्यान ऐतिहासिक आणि सांस्कृतिक वारसा संबंध आणखी वृध्दींगत होण्याची अपेक्षा आहे.

**<u>हिजबुल्ला</u>**

इस्रायली संरक्षण दल अर्थात IDF नं  काल रात्री लेबनॉनची राजधानी बैरूत इथं केलेल्या हवाई हल्ल्यात हिजबुल्लाचा वरिष्ठ कमांडर नाबिल कौक ठार झाला. इस्रायली हवाई दलाच्या लढाऊ विमानांनी इस्रायली लष्करी गुप्तचर अमानच्या निर्देशानुसार नाबिल कौकवर हल्ला केला आणि त्याला ठार करण्यात आल्याचं IDF नं  समाजमाध्यमांवर एका संदेशाद्वारे जाहीर केलं आहे. इस्रायली सुरक्षा दलांच्या म्हणण्यानुसार, नाबिल कौक याचा हिजबुल्लाच्या वरिष्ठ नेतृत्वाशी जवळचा संबंध होता. तो केंद्रीय समितीचा उपप्रमुख होता. गेल्या शुक्रवारी दक्षिण बेरूतमधील गटाच्या मुख्यालयावर झालेल्या प्राणघातक हवाई हल्ल्यात हिजबुल्लाचा प्रमुख हसन नसराल्लाहच्या मृत्यूनंतर कौकवर हल्ला करण्यात आला.

**नेपाळ पूर**

पूर, भूस्खलन आणि इतर नैसर्गिक आपत्तीच्या गेल्या काही दिवसांमध्ये झालेल्या घटनांमध्ये नेपाळमधील 132 लोकांचा मृत्यू झाल्याच्या वृत्ताला नेपाळच्या गृह मंत्रालयानं दुजोरा दिला आहे. आतापर्यंत काठमांडू खोऱ्यात 68, बागमती प्रांतात 45, कोशी प्रांतात 17 आणि मधेस प्रांतात दोन जण या आपत्तीच्या घटनांमध्ये मृत्युमुखी पडले आहेत. त्याचप्रमाणे विविध घटनांमध्ये 64 लोक बेपत्ता झाले असून 61 जण जखमी झाले आहेत. सुरक्षा दलांच्या मदतीनं देशभरात तीन हजार सहाशे सव्वीस लोकांची सुखरूप सुटका करण्यात आल्याचं मंत्रालयानं स्पष्ट केलं आहे.

**बिहार-पुर**

बिहारमधील शिवहर जिल्ह्यात बागमती नदीची पाणीपातळी वाढल्याने तरीयाकी ब्लॉक भागातील नदीकिनारीचा परिसर जलमय झाला आहे. तरीयानी छप्रा गावातील अनेक घरांत पुराचे पाणी शिरलं असून पूरस्थितीच्या पार्श्वभूमीवर सीतामढी आणि मुझफ्फरपूर जिल्ह्यातील नदीकाठच्या गावांना सतर्कतेचा इशारा देण्यात आला आहे.

**सुनावणी**

कोलकाता इथल्या आर. जी. कर सरकारी वैद्यकीय महाविद्यालय आणि रुग्णालयातील कनिष्ठ डॉक्टरच्या बलात्कार आणि हत्येप्रकरणी आज सर्वोच्च न्यायालयात सुनावणी होणार आहे. सरन्यायाधीश न्यायमूर्ती डॉक्टर धनंजय चंद्रचूड यांच्या अध्यक्षतेखालील तीन न्यायाधीशांच्या खंडपीठानं 30 सप्टेंबर रोजी या खटल्याची पुन्हा सुनावणी सुरू करणार असल्याचं जाहीर केलं होतं. गेल्या आठवड्यात न्यायमूर्ती जे. बी. पारडीवाला आणि न्यायमूर्ती मनोज मिश्रा यांचा समावेश असलेल्या खंडपीठानं पश्चिम बंगाल सरकारच्या विनंतीवर 27 सप्टेंबर रोजी होणारी सुनावणी पुढे ढकलण्याचा निर्णय घेतला होता. यापूर्वी महिला डॉक्टरांना रात्री कामावर ठेवू नये अशा आशयाच्या राज्य सरकारच्या आदेशाकडे लक्ष वेधल्यानंतर सर्वोच्च न्यायालयाने चिंता व्यक्त केली आहे.

**दहशतवादी ठार**

जम्मू-काश्मीरमधील कथुआ जिल्ह्यातील एका दुर्गम गावात सुरू असलेल्या शोध मोहिमेदरम्यान सुरक्षा दलांतर्फे करण्यात आलेल्या कारवाईत काल एक दहशतवादी मारला गेला. त्यामुळे या घटनेतील मृतांची संख्या दोन झाली आहे. आकाशवाणी जम्मू प्रतिनिधीनं दिलेल्या वृत्तानुसार, काल कथुआ जिल्ह्यातील बिलावर तहसीलमधील कोगमांडली इथं झालेल्या चकमकीच्या घटनास्थळी दहशतवाद्याचा मृतदेह सापडला. गावात दुसऱ्या दिवशीही मोठ्या प्रमाणावर शोधमोहीम सुरू आहे.

**हॉकी इंडिया**

हॉकी इंडिया कनिष्ठ महिला राष्ट्रीय अजिंक्यपद स्पर्धा 2024 च्या चौदाव्या आवृत्तीला आजपासून झारखंडमधील रांची इथं सुरुवात होणार आहे. या स्पर्धेमध्ये 26 संघ सहभागी होत असून प्रत्येक गटातील अव्वल संघ उपांत्यपूर्व फेरीसाठी पात्र ठरतील. या फेरीचे सामने 7 ऑक्टोबर 2024 रोजी खेळले जाणार आहेत. त्यानंतर उपांत्य फेरीचे सामने 9 ऑक्टोबर रोजी होतील. उपांत्य फेरीतील विजेते अंतिम फेरीत एकमेकांशी लढणार असून उपांत्य फेरीतील पराभूत संघ 10 ऑक्टोबर रोजी कांस्यपदकासाठी एकमेकांशी लढणार आहेत.

**हवामान**

पुढील 4 ते 5 दिवस ईशान्य भारतातील काही भागात मुसळधार पावसाचा इशारा हवामान विभागानं दिला आहे. तामिळनाडू आणि केरळमध्ये तुरळक ठिकाणी आज तर आसाम, मेघालय, नागालँड, मणिपूर, मिझोरम, त्रिपुरा आणि अरुणाचल प्रदेशमध्ये या आठवड्यात पावसाची शक्यता आहे.

## याबरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं, नमस्कार.